# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक ७वा (ऑक्टोबर,नोव्हेंबर,डिसेंबर २०२४)

आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४ / ९६९९०९१२३३

Email : gharkulparivar@gmail.com l Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय ...

सप्रेम नमस्कार.

घरकुल आनंदयात्राचा हा सातवा अंक!

यामध्ये ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर 2024 मधील वृत्तांत आपल्यासमोर सादर करीत आहोत. या कालावधीत गडबड होतीच दिवाळीच्या निमित्ताने स्टॉल लावण्यासाठी निमंत्रणे, आकाश कंदील , गिफ्ट हॅम्पर यांच्या ऑर्डर पूर्ण करणे, दिवाळी सेलिब्रेशन चा कार्यक्रम ,मुलींच्या दिवाळीच्या सुट्ट्या आणि सुट्ट्या संपवून मुली परत घरकुलला स्थिरस्थावर होणे, असे नेहमीचेच चक्र असते. त्यातही घरकुल ला भेट देणारे असंख्य विजिटर्स, मिळणाऱ्या ऑर्डर्स ,नवीन काहीतरी प्रॉडक्टची कल्पना सुचणे ते करून पाहणे इत्यादी गोष्टी घरकुल मध्ये सातत्याने घडत असतात. त्यातून एक ऊर्जा चक्र अव्यहातपणे फिरत राहते. नेहमीचे बॉलपेन असेंब्ली चे काम तर असतेच. या धावपळीत एक गंमत आहे.

आपल्यापैकी अनेक जण जेंव्हा केंव्हा घरकुलात येतात, मुलींना भेटतात तेव्हा तुम्हाला ही धावपळ जाणवत असेलच.

ज्यांचे येणे शक्य होत नाही त्यांना या त्रैमासिक पत्रिकेच्या माध्यमातून ही "आनंदयात्रा" घडावी हाच उद्देश आहे.

आपण नवीन वर्षात प्रवेश केला आहे.

सर्वांना 2025 या नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा हे वर्ष आनंदाचे उत्तम स्वास्थ्याचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा!!

***

-: संपादकीय मंडळ :-


सौ. सुनिता आडके — सौ. साधना देशमुख

सौ. विद्या फडके — सौ. वल्लरी प्रधान

श्री. नरेश महाजन — डॉ. सुचिता संकपाळ

# भेटीगाठी व कार्यक्रम

## ऑक्टोबर

- दिनांक 2 ऑक्टोंबर रोजी महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती घरकुल मधील परिसर स्वच्छता व श्रमदान करून साजरी करण्यात आली. विद्याताईंनी गांधीजींच्या जीवनावर आधारित गोष्ट सांगितली तर देव मावशींनी माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या बद्दल माहिती सांगितली.
- दिवाळीनिमित्त आयोजित विविध प्रदर्शना त घरकुलचे स्टॉल लावण्यात आले.

1. नाशिक बंगाली असोसिएशन ,गंगापूर रोड यांनी दुर्गा पुजा निमित्ताने आयोजित कार्यक्रमात घरकुलचा स्टॉल लावण्यास निमंत्रित केले होते.
2. पुणे येथील रोटरी क्लब पुणे आयोजित सृजन प्रदर्शनात दोन दिवस घरकुलचा स्पेशल दिवाळी प्रोडक्टचा स्टॉल लावण्यात आला.
3. ABB कंपनीने दिवाळी विशेष वस्तूंचा स्टॉल त्यांच्या कंपनी परिसरात लावण्यासाठी निमंत्रित केले.





मुंबई ग्राहक पंचायत अंधेरी यांच्या 'सेतू बांधा रे' या उपक्रमांतर्गत घरकुल मध्ये तयार होणाऱ्या विविध वस्तूंचा विशेषतः आकाश कंदील, तोरण, पणत्या, सुशोभित मेणबत्ती इत्यादी वस्तूंना चांगली मागणी होती. सुप्रसिद्ध मराठी अभिनेता व निर्माते श्री सुबोध भावे व सौ मंजिरी भावे यांनी घरकुलच्या स्टॉलला भेट दिली.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## ऑक्टोबर




रणरागिणी मराठा महिला मंडळ यांच्या तर्फे दिवाळी निमित्त आयोजित प्रदर्शनात घरकुल चा स्टॉल




रोटरी क्लब आयोजित "हाट बाजार " मध्ये घरकुल चा स्टॉल




मनोहर गार्डन येथे आयोजित प्रदर्शनात आयोजिका गौरी ठक्कर, विद्या ताई, ममता ताई आणि विद्यार्थिनी अनिता सावंत

- या प्रकारच्या सहभागामुळे घरकुल ला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते यंदा लावलेल्या प्रत्येक स्टॉलवर घरकुलच्या एक-दोन विद्यार्थिनींना विक्रेता काम करण्याची संधी देण्यात आली यामुळे या मुलींना आनंद तर झालाच पण एक नवा आत्मविश्वास मिळाला.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## ऑक्टोबर

### घरकुल मधील दिवाळी



दरवर्षीप्रमाणे यंदाही स्लाईड वेल कंपनी व घरकुल यांची एकत्रित दिवाळी साजरी करण्यात आली. यावर्षी अनंत विजय शंखनाद पथकाचा 'शंखनाद' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेण्यात आला, तसेच या कार्यक्रमात 'नाशिक म्युझिक क्लब' यांचाही सहभाग होता त्यांनी जुनी हिंदी गाणी सादर केली.

- विद्यार्थिनींना दिवाळीच्या सुट्ट्या ऑक्टोबर 29 ते नोव्हेंबर 13 पर्यंत दिलेल्या होत्या. मुलींना घरी नेण्यासाठी पालक सकाळी घरकुलात येतात, त्यामुळे तेव्हाच पालक सभेचे आयोजन केले जाते त्याप्रमाणे पालक सभा आयोजित करण्यात आली. दिवाळीनिमित्त पणत्या, आकाश कंदील, खाद्यपदार्थ इत्यादींच्या विविध कंपन्या व व व्यक्तींनी ऑर्डर देखील दिल्या होत्या त्या सर्व वेळेत पूर्ण करण्यात आल्या.
- ऑक्टोबर महिन्यात घरकुल मला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्यात



ऋषभ इंडस्ट्रीजचे नरेंद्रभाई गोलिया व आशा गोलिया यांनी कंपनीच्या मुंबई येथील सहकाऱ्यांसह घरकुल ला भेट दिली व सर्व कामकाज बघितले.

# भेटीगाठी व कार्यक्रम




घरकुलचे विश्वस्त श्री उमेश भाई राठी यांच्या फ्रेंडशिप फोर्स इंटरनॅशनल ग्रुपच्या रशियातील 18 सदस्यांनी घरकुल ला भेट दिली.



चांदवड येथील  पॉलिटेक्निक कॉलेज च्या विद्यार्थ्यांची घरकुल la भेट

## नोव्हेंबर 2024



पार्कर अँड लॉर्ड कंपनी नाशिक व पार्कर हॅनिफीन इंडिया यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घरकुल ला भेट दिली.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## नोव्हेंबर 2024



नाशिक चॅरिटी कमिशनर ऑफीस चे प्रमुख श्री अकाली सर (प्रिन्सिपल जज )व कार्यालयातील इन्स्पेक्टर उस्मान सर यांनी संस्थेला भेट दिली.

## डिसेंबर 2024



जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. ह्या निमित्ताने सर्व ताई व मावशींनी विद्यार्थिनींना विविध महापुरुषांच्या वेशभूषा करून त्या महापुरुषांविषयी माहिती सादर केली, यामध्ये लोकमान्य टिळक, बाबा आमटे ,धोंडो केशव कर्वे ,लाल बहादूर शास्त्री आशा अनेक वेशभूषांचा समावेश होता.

# भेटीगाठी व कार्यक्रम



बदलापूर येथील श्रीमती माधुरी जोशी व त्यांची U.K.स्थित कन्या कांचन भागवत यांनी घरकुल ला भेट दिली. 'दिल के करीब 'या कार्यक्रमामुळे त्यांना घरकुलची माहिती कळली.

दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आयोजित 'द विंटर प्ले' या मेळाव्यामध्ये घरकुल चा स्टॉल ठक्कर डोम येथे लावला होता.






स्टाफ साठी संवाद कौशल्य या विषयावर ममता माशाळकर यांनी कार्यशाळा घेतली.



नाशिक पोलीस आयुक्त श्री संदीप कर्णिक यांच्या कार्यालयाकडून घरकुल ला हायजिन किट पाऊच व ब्लँकेट भेट देण्यात आले.

# भेटीगाठी व कार्यक्रम

## डिसेंबर 2024



घरकुल चे हितचिंतक श्री अरुण मांजरे यांनी त्यांचा वाढदिवस घरकुल मध्ये साजरा केला



SMRK च्या विद्यार्थिनींनी  ख्रिसमस पार्टी आयोजित केली



सामाजिक बांधिलकी ग्रुप मुंबई यांनी संस्थेला भेट दिली

- SWS Financial Solutions च्या श्री सचिन चंद्रात्रे यांनी स्टाफ साठी 'गुंतवणुकीचे महत्त्व व स्वरूप' याविषयी मार्गदर्शन केले.

## भेटीगाठी व कार्यक्रम

*** आवाहन ***

**-: ऑनलाईन देणगीसाठी :-**

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

| | |
|---|---|
| A/C Name : | Gharkul Parivar Sanstha |
| Bank Name : | Bank of India |
| Branch : | Shivaji Udyan, Nashik |
| A/C No. : IFSC : | 080610110000256<br>BKID0000806 |



मृत्यु दि.२९/१२/२०२४

### विनम्र श्रद्धांजली

## श्रीमती मेघना माधव जोशी

घरकुल परिवारातील सुरुवातीच्या सदस्यापैकी एक श्रीमती मेघना माधव जोशी (घरकुलची विद्यार्थिनी युगंधरा जोशी हिची आई) यांना 29 डिसेंबर 2024 रोजी देवाज्ञा झाली.

**घरकुल परिवारातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली**

# ABB company the strongest pillar of Gharkul




Gharkul Parivar Sanstha is today standing firmly in the field of rehabilitation of mentally challenged girls and women.

There are many great personalities who became strong pillars for Gharkul. The industrial world of Nashik has also strongly Supported us.

The ABB company of Satpur Nashik is one of these industries who is consistantly helping us.

During the year 2013 - 2014 then vice president of ABB Mr Satyashil ji Pradhan visited Gharkul. He realised the significance of our work . After the visit he had a word with his top management and they took decision to support Gharkul by taking financial responsibility of every needy student of Gharkul.

Since then ABB company has kept the commitment and continued the assistance generously.

Even after retirement and sad demise of Mr Pradhan, the existing officials like Ms.Dhenuka Madam - Country..head .CSR funds and other top officials always make it a point to visit gharkul and have a word with our students. Mr Amit Saini sir is also supporting us. ABB company always invite us to display our products for Diwali.

Few years back gharkul used to supply Ragi Papad to ABB company.

In many ways ABB company has become one of the strongest support. Our students can stay with dignity and happiness due to such support.

We are very greatful to ABB Company!

# विश्वासू सहकारी



## संध्या देशपांडे

संध्या ताई देशपांडे घरकुल मध्ये 2014 पासून कार्यरत आहेत. घरकुल मध्ये काळजीवाहक म्हणून त्या सेवा देत आहेत .त्यांची कन्या दर्शना देशपांडे घरकुलचीच विद्यार्थिनी आहे. त्यामुळे संध्या ताई एक पालक आणि काळजीवाहक अशा दोन्ही भूमिका पार पाडतात. तीव्र स्वरूपाचे मानसिक दिव्यांगत्व असलेल्या मुलींची काळजी त्या घेतात. त्यांची दैनंदिन स्वच्छता ,जेवण ,आजारी पडल्यावर शुश्रुषा, असे सगळे त्या मनापासून करतात .संध्याताईंच्या कौटुंबिक व वैयक्तिक समस्यांमुळे संध्याताई आणि दर्शनाचे घरकुल हेच कायमचे घर आहे

विद्याताईंनी संध्याताई ना प्रसंगी आईच्या मायेने सांभाळून घेतले आहे. दर्शनापेक्षाही कधीकधी त्यांच्यावर इतर काही मुली जास्त हक्क सांगतात, हट्ट करतात संध्या ताई देखील तेवढ्याच प्रेमाने मुलींचे सगळे हट्ट पूर्ण करतात आणि दर्शना इतकेच इतर मुलींनाही जीव लावतात .

अशा या संध्या देशपांडे घरकुलच्या विश्वासू सहकार्यांमधील एक होय.

# एकेकीची गोष्ट

## अदिती जाधव



अदिती मागील बारा वर्षापासून घरकुल मध्ये शिकत आहे अदितीला तिच्यातील कमतरतेमुळे लिहिता वाचता येत नाही. मात्र संस्थेत आल्यापासून तिच्यातील अन्य सुप्त गुणांचा मागोवा घेऊन विद्याताई व इतर शिक्षकांनी अदिती मध्ये अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत.

या सर्वांच्या प्रयत्नांमुळे आज अदितीच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पडलेत व तिने अनेक कौशल्ये आत्मसात केली. त्याच्याच परिणाम म्हणून तिला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले गेले.

बारा वर्षांपूर्वी घरकुल मध्ये दाखल झालेली एक अबोल शांत लिहिता वाचता न येणारी अदिती सर्व शिक्षकांच्या आणि तिची आई झालेल्या विद्याताई च्या अथक प्रयत्नांनी नाचू गाऊ लागली, कुंचल्याशी सख्य करून चित्र काढून घरकुल सजवू लागली. आता ती विविध कार्यक्रमांमध्ये, स्पर्धांमध्ये नृत्य सादरीकरण तर करतेच परंतु घरकुल मधील इतर मुलींना नृत्य देखील शिकवते.

अदितीची उल्लेखनीय कामगिरी व पुरस्कार

1) लोकनृत्य (जोगवा आईचा)

2)राष्ट्रभक्तीपर गीत गायन व नृत्य

3)संस्कृत मधील वंदे मातरम तिला संपूर्ण पाठ आहे.

अदितीला मिळालेले पुरस्कार

आंतरराष्ट्रीय पुरस्कार

ग्लोबल कौन्सिल ऑफ आर्ट अँड कल्चर यांच्यातर्फे डिसेंबर 2019 मध्ये सिंगापूर येथील स्पर्धेत अदितीला लोकनृत्य मध्ये सुवर्णपदक प्राप्त झाले.

राष्ट्रीय पुरस्कार

अखिल भारतीय संस्कृती संघ पुणे येथे आयोजित सर्वसाधारण मुलांच्या श्रेणीत 3000 स्पर्धकांमधून नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक

रोटरी क्लब द्वारे आयोजित अखिल भारतीय पातळी वरील ऑनलाईन सोलो डान्स स्पर्धेत द्वितीय क्रमांक

अशी ही अदिती घरकुलचा अभिमान आहे तिने सर्व शिक्षकांच्या कष्टाचे चीज केले आहे आणि अशा अनेक अदिती घडवणे हेच घरकुलचे अंतिम ध्येय आहे.

# अभ्यागतांच्या लेखणीतून..

घरकुल ला रोज पाहुणे येतात .घरकुल बघतात. इथलं वातावरण ,आमच्या विद्यार्थिनी, स्वच्छता याबद्दल भरभरून बोलतात आणि प्रतिक्रिया वहीत आपले मत नोंदवतात. काहीजण व्हाट्सअप वरून कौतुकाची बरसात करतात. या कौतुकाने मन भारावते तसेच जबाबदारीही वाढते.

अशीच काही निवडक मनोगते या अंकात आपल्या सोबत शेअर करीत आहोत.

*** श्री .राम देशपांडे कोल्हापूर (वय वर्ष 87 )**

वि. स. खांडेकर, ना .सी .फडके ,राम शेवाळकर यांच्या सारख्या थोर लेखकाचे ते लेखनिक होते.

घरकुलचे एक विश्वस्त आणि सुप्रसिद्ध लेखक श्री. नरेश महाजन यांनी त्यांच्या यूट्यूब चैनल वर विद्याताईंची मुलाखत घेतली होती. ही मुलाखत श्री. देशपांडे यांनी बघितली आणि ते भारावून गेले. घरकुल साठी त्यांनी 500 रुपये मनीऑर्डरने पाठविले. घरकुलला ही मदत खूप मोलाची वाटते.

श्रीयुत राम देशपांडे सर आपणाला सस्नेह नमस्कार!

*** श्रीमती माधुरी जोशी ,बदलापूर**

यांनी विद्याताईंची ची “दिलके करीब” वरील मुलाखत बघितली आणि घरकुल ला भेट द्यायचं ठरवलं. 5 डिसेंबर 2024 ला त्यांच्या कन्येसहित त्या घरकुलात आल्यात आणि पूर्ण दिवस त्यांनी घरकुल मध्ये घालवला. मुलींबरोबर गप्पा मारल्या.

व्हाट्सअप वरती त्यांनी त्यांचं मनोगत पाठवलं आहे.

" आज घरकुल ला भेट देण्याचा योग आला मानसिक दिव्यांग महिलांसाठी संस्था अतिशय उत्तम काम करीत आहे संस्थेचे नियोजन कामाची शिस्त या महिलांचे दिव्यांगत्व लक्षात घेऊन बांधलेली इमारत ,वेळापत्रक, व्यवसाय प्रशिक्षण, संगीत ,चित्रकला याबद्दलचे प्रशिक्षण हे बघून मन अगदी भारावून गेले.

हे काम अजिबात सोपं नाही पण येथील सेविका ,मावशी अतिशय प्रेमाने व तन्मयतेने काम करतात.

विद्याताई !तुम्ही घरकुलचा श्वास आहात. संस्था नावारूपाला आणण्यात अनेकांच्या सहभाग असला तरी सर्व फुलांना एकत्र गुंफणारा धागा तुम्ही आहात .आज कितीतरी कुटुंबांना या महिलांची जबाबदारी घेऊन दिलासा देण्याचे महान कार्य आपण करीत आहात. या कार्यास व आपणास नमस्कार !

माधुरी जोशी ,

बदलापूर

# Visitors review

A team of senior officials of Parker Hannifin India Pvt. Ltd Mumbai and Lord India Pvt. Ltd Nashik, visited Gharkul on November 26th 2024.
A representative review from one of their officers by **Mr.Himanshu Sir**...
As the name suggests Gharkul is the home where women are treated with the dignity, respect and most importantly they are taken care with the home kind of environment. It was really an inspiring experience. The staff here is taking tremendous efforts for overall development of women challenged with the different issues. The way they take care of the daily activities is very commendable. Great vision overall and it was an inspiring visit.
We would like to do our best in personal and professional capacity for the betterment of these women and make the management achieve their vision. All the best for future and keep up good work.

## कृतज्ञतेचा नमस्कार....

एखाद स्वप्न पूर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी सगळ विश्व तुम्हाला साहाय्यभूत होत. अस म्हणतात ते खोठ नाही. घरकुल सुरु झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ - १८ वर्षाचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आलेय यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठ संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे. त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ सहकार्य जिव्हाळा हवा आहे. आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार! घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.